मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मंगलसुरांच्या दीपबंधाने उजळली दिवाळीची पहाट

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'दिवाळी पहाट'ला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या भारतरत्न पं. भीमसेन जोशी संगीत अकादमीतर्फे आयोजित 'दिवाळी पहाट २०२५ – दीपबंध सुरांचा' हा संगीतमय सोहळा आकुर्डीतील ग.दि. माडगूळकर नाट्यगृहात उत्साहात पार पडला.

महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात गायक-वादकांच्या सुरेल प्रस्तुतींनी रसिकांना भावविभोर केले.

गायक कोमल कृष्णा, राजेश्वरी पवार, विनल देशमुख, गणेश मोरे यांनी मराठी-हिंदी गीतांनी रंग भरले, तर वादक नितीन खंडागळे, सुबोध जैन, दीपक काळे, शाम चंदनशिवे, सागर घोडके यांच्या वादनाने वातावरण भारावले.

कार्यक्रमादरम्यान 'मिस अर्थ इंडिया २०२५' विजेती कोमल चौधरी हिचा सन्मान महापालिकेतर्फे करण्यात आला. त्या भारताचे प्रतिनिधित्व जागतिक 'मिस अर्थ' स्पर्धेत करणार असून, त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



# पिंपरी-चिंचवडकरांसाठी महायुती सरकारचे "दिवाळी गिफ्ट"

## टाळगाव चिखलीतील 5 एकर जागेत होणार तहसीलदार कार्यालय

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड अपर तहसील कार्यालयासाठी आता हक्काच्या जागेचा प्रश्न कायमस्वरुपी सुटला आहे. टाळगाव चिखली येथील 5 एकर जागा तहसील कार्यालयास उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावाला राज्याच्या महसूल नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने मान्यता दिली. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याकामी सकारात्मक निर्णय घेतला. पिंपरी-चिंचवडकरांसाठी हक्काच्या जागेत तहसील कार्यालय उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.




सुमारे 35 लाख लोकसंख्या असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराच्या अपर तहसीलदार कार्यालयासाठी जागेचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. त्यामुळे दोन-तीन ठिकाणी कार्यालय स्थलांतरीत करावे लागले. तहसीलदार कार्यालयासाठी हक्काची जागा मिळावी. त्याठिकाणी सुसज्ज तहसीलदार कार्यालय, निवासस्थान, नागरी सुविधा केंद्रसुद्धा उभारण्यात यावे. या करिता भाजपा आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्याला अखेर यश मिळाले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये झालेल्या बैठकीतही पिंपरी-चिंचवड शहराच्या तहसीलदार कार्यालयासाठी प्रस्तावित जागेचा प्रश्न मार्गी लावावा. याबाबत लक्ष वेधण्यात आले होते. याबाबत पुणे जिल्हाधिकारी प्रशासनाकडे जागेची मागणी करण्यात आली. महसूल आणि जिल्हा प्रशासनाच्या सकारात्मक अभिप्रायानंतर चिखली येथील स. नं. 539 येथील 5 जागा अपर तहसीलदार कार्यालय पिंपरी-चिंचवडसाठी मिळावी, असा प्रस्ताव पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाने राज्याच्या महसूल नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडे पाठवला होता. त्याला मान्यता मिळाली आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ३१ डिसेंबर २०१५ नुसार ज्या ठिकाणी राज्य शासनाचे रितसर मान्यता प्रदान केलेल्या शासकीय प्रकल्पाकरीता शासकीय जमीन आवश्यक असेल तेथे अशा जमीनीचे भोगवटा मूल्य कितीही असले, तरी जिल्हाधिकारी अशी जमीन राज्य शासनाच्या संबंधित विभागास महसुल मुक्त व सारामाफीने प्रदान करण्यास सक्षम राहतील, असे नमुद केलेले आहे. या नियमाला अनुसरून जागा उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

> "पिंपरी-चिंचवडकरांच्या अनेक वर्षांच्या प्रतीक्षेला आता पूर्णविराम मिळाला आहे. टाळगाव चिखली येथे तहसील कार्यालयासाठी हक्काची ५ एकर जागा उपलब्ध झाल्यामुळे आता नागरिकांना सुसज्ज व कार्यक्षम सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हे यश सर्वसामान्य जनतेच्या पाठिंब्यामुळे आणि सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे मिळाले आहे. लवकरच या ठिकाणी आधुनिक व सुसज्ज तहसील कार्यालय उभारण्यासाठी आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधा उभ्या करण्यात येतील. या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी मी मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांचे मनःपूर्वक आभार मानतो. त्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे पिंपरी-चिंचवडच्या लाखो नागरिकांना प्रभावी प्रशासकीय सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पिंपरी-चिंचवड शहराची वाटचाल शाश्वत विकासाच्या दिशेने सुरू आहे, याचे समाधान वाटते.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# पिंपरीतील पोलीस ठाण्यांची संख्या चोवीसवर

## दोन पोलीस ठाण्यांच्या निर्मितीचा प्रस्ताव; पिंपरी-चिंचवडमध्ये 9 अधिकारी पदांना मंजुरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून चाकण, म्हाळुंगे एमआयडीसी भागात नव्याने दोन पोलीस ठाण्यांच्या निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला होता. त्याला शासनाच्या उच्चस्तरीय समितीने मान्यता दिली आहे. चाकण पोलीस ठाण्याचे विभाजन करून चाकण दक्षिण आणि म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे विभाजन करून उत्तर म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे तयार केले जाणार आहे. त्यामुळे पोलीस ठाण्यांची संख्या २४ होणार आहे. तसेच तीन उपायुक्त, सहा सहायक आयुक्त पदांना देखील मंजुरी देण्यात आली आहे.




पोलीस आयुक्तालयांतर्गत सध्या तीन परिमंडळांमध्ये प्रत्येकी एक, गुन्हे शाखा, मुख्यालय आणि वाहतूक शाखा यासाठी प्रत्येकी एक असे सहा उपायुक्त आहेत. वाहतूक शाखा उपायुक्त पदासाठी अपर पोलीस आयुक्त पद अवनत करण्यात आले आहे. त्यामुळे सध्या सहा पोलीस उपायुक्त उपलब्ध आहेत. नव्याने तीन उपायुक्त पदांच्या प्रस्तावाला अंतिम मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे आठ उपायुक्त उपलब्ध होणार आहेत. सध्या १२ सहायक आयुक्त, तसेच एक वायरलेस विभागाचे सहायक आयुक्त अशी १३ पदे आहेत. त्यात आणखी सहा सहायक आयुक्त पदांना शासनाची मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे आता १८ सहायक आयुक्त आणि एक बिनतारी संदेश विभाग (वायरलेस) सहायक आयुक्त अशी १९ पदे उपलब्ध होणार आहेत.

> चाकण दक्षिण, उत्तर म्हाळुंगे पोलीस ठाण्यांना उच्चस्तरीय समितीने मान्यता दिली आहे. तीन उपायुक्त, सहा सहायक आयुक्त पदांना देखील मंजुरी मिळाली आहे.
>
> **- डॉ. शिवाजी पवार,**
> **पोलीस उपायुक्त.**

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत तीन परिमंडळ आहेत. त्यामध्ये २२ पोलीस ठाणे आहेत. चाकण दक्षिण आणि उत्तर म्हाळुंगे एमआयडीसी या दोन पोलीस ठाण्यांच्या निर्मितीनंतर पोलीस ठाण्यांची संख्या २४ होणार आहे. तीन परिमंडळांमध्ये प्रशासकीय ताण वाढणार असल्याने परिमंडळांची संख्या देखील वाढवली जाणार आहे. चौथ्या परिमंडळाच्या मंजुरीबाबत प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे. त्याला देखील लवकरच मान्यता मिळण्याची शक्यता असल्याचे पोलिसांनी सांगितले. आयुक्तालयांतर्गत अपर पोलीस आयुक्तांची दोन पदे मंजूर आहेत. मात्र त्यातील एक पद अवनत केले आहे. त्यामुळे सध्या एकच अपर आयुक्त पद कार्यरत आहे. उपायुक्तांनी तीन पदे मंजूर झाल्यानंतर उपायुक्तांची संख्या पुरेशी होईल. त्यानंतर अवनत केलेले पद पुन्हा पूर्ववत करून अपर पोलीस आयुक्तांची दोन पदे होणार आहेत.

---

# "अंध बांधवांसोबत माणुसकीची दिवाळी साजरी"!

## साद सोशल फाउंडेशन आणि इरफानभाई सय्यद सोशल फाउंडेशनचा कौतुकास्पद उपक्रम

**पिंपरी | प्रतिनीधी**

गेल्या अनेक वर्षांपासून अंग बांधव भगिनींनो सोबत दिवाळी साजरी करण्याचा उपक्रम यंदा देखील साद सोशल फाउंडेशन आणि इरफानभाई सय्यद सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. या उपक्रमाच्या माध्यमातून 400 अंध बंधू-भगिनींच्या चेहऱ्यावर हसू फुलले.

शिवसेना उपनेते तथा महाराष्ट्र मजदूर संघटनेचे अध्यक्ष इरफान सय्यद, साद सोशल फाउंडेशनचे सदस्य आणि इरफानभाई सय्यद सोशल फाउंडेशनच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी करण्यात आला. या सोहळ्याला पिंपरी चिंचवड महापालिकेचे माजी महापौर राहुल जाधव, माजी उपमहापौर शरद बोऱ्हाडे, शिवसेना उपनेते सुलभा उबाळे, माजी नगरसेवक उत्तम केंदळे, बाप्पू घोलप, शिवसेना पुणे जिल्हा प्रमुख भगवान पोखरकर, निलेश मुटके, संभाजी शिरसाट, निखिल बोऱ्हाडे, निलेश नेवाळे, संतोष जाधव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, समाजसेवक, स्थानिक नागरिक आणि स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

“दिवाळी आनंद सोहळा” या उपक्रमाचे हे अकरावे वर्ष असून, यंदाही तो मोठ्या आत्मीयतेने आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आला. कार्यक्रम काळभोर लॉन्स, शालिमार बँक्वेट, दुर्गानगर चौक, निगडी, पुणे येथे कार्यक्रम पार पडला. यामध्ये सुमारे चारशे अंध बांधव आणि भगिनींना दिवाळीच्या आनंदाची अनुभूती देण्यात आली. त्यांना “दिवाळी फराळ किट” वाटप करून दिवाळीचा सण साजरा करण्यात आला.






> दिवाळी फक्त सजावट आणि फटाक्यांचा सण नाही. प्रत्येकाच्या जीवनात आनंद, सर्व समभाव आणि मदतीची वाट दाखवणारा सण आहे. साद फाउंडेशनच्या माध्यमातून अंध बांधवांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्याचा प्रयत्न दरवर्षी केला जातो. अंध बांधवांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधानाचे हास्य हेच या उपक्रमाचे खरे यश आहे. या सेवेत सातत्य ठेवत भविष्यातही असे उपक्रम राबवण्याचा निर्धार आहे.
>
> **- इरफान सय्यद, शिवसेना उपनेते**
> **तथा अध्यक्ष महाराष्ट्र मजदूर संघटना**

# आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या अनुषंगाने रस्ते विकासाचा सर्वंकष आराखडा तयार करा

## मंत्री चंद्रकांत पाटील यांचे निर्देश, पुण्यातील नागरी समस्या सोडवण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनामध्ये बैठक

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी काळात पुण्यात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायकलिंग स्पर्धेसाठी रस्ते विकासाचा सर्वंकष आराखडा तयार करून दर्जेदार रस्त्यांची निर्मिती करावी, असा निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. रस्ते विकास आणि महावितरणशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्याचे निर्देश नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी या बैठकीत दिले.

नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या सूचनेनुसार पुणे महानगरपालिकेच्या खात्याशी संबंधित विविध विकास कामांसंदर्भात आढावा बैठक आज संपन्न झाली. यावेळी आयुक्त नवलकिशोर राम, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी., ओमप्रकाश दिवटे, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, आमदार योगेश टिळेकर, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, हेमंतजी रासने, बापूसाहेब पठारे, पथ विभागाचे मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर, पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप यांच्यासह सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.



### विकास प्रकल्प वेगाने पूर्ण करावेत

» चंद्रकांत पाटील म्हणाले, "शहरात सुरू असलेले विकास प्रकल्प वेगाने पूर्ण करावेत. तसेच पावसाळ्यामुळे झालेले पुण्यातील रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजविण्यास प्राधान्य द्यावे. विविध विधानसभा मतदारसंघातील खड्डे बुजविल्याचा अहवाल सर्व आमदारांना नियमितपणे उपलब्ध करून द्यावा. आगामी काळात पुणे शहरात आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायकलिंगची स्पर्धा होणार आहे. त्यासाठी दर्जेदार रस्ते आवश्यक आहेत. त्यामुळे महापालिकेने यासाठी रस्ते विकासाचा सर्वांकष आराखडा सादर करावा, असे निर्देश दिले.

बैठकीच्या सुरुवातीला आयुक्त नवकिशोर राम यांनी विविध विभागाच्या माध्यमातून शहरात सुरु असलेल्या कामांची माहिती दिली. त्यात प्रामुख्याने रस्ते, पाणीपुरवठा यांसह इतर महत्त्वाच्या विभागांचा समावेश होता.

त्यावर चंद्रकांत पाटील म्हणाले, "शहरात सुरू असलेले विकास प्रकल्प वेगाने पूर्ण करावेत. तसेच पावसाळ्यामुळे झालेले पुण्यातील रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजविण्यास प्राधान्य द्यावे. विविध विधानसभा मतदारसंघातील खड्डे बुजविल्याचा अहवाल सर्व आमदारांना नियमितपणे उपलब्ध करून द्यावा. आगामी काळात पुणे शहरात आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायकलिंगची स्पर्धा होणार आहे. त्यासाठी दर्जेदार रस्ते आवश्यक आहेत. त्यामुळे महापालिकेने यासाठी रस्ते विकासाचा सर्वांकष आराखडा सादर करावा, असे निर्देश दिले.

### सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करावा

» राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या, "पीएमपीएमएलच्या ताफ्यात नव्याने समाविष्ट होणाऱ्या एक हजार बसेसचे देखभाल दुरुस्तीसह आर्थिक नियोजन करावे. पीएमपीएमएलला होणारा आर्थिक तोटा दोन्ही महापालिका भरून काढतात. आता त्यांनी आर्थिक सक्षम झाले पाहिजे. कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग, वेतनातील फरक, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याचे नियोजन करावे. तसेच महावितरणच्या विद्युततारा भूमिगत करणे आणि रस्त्यातील पथदिव्यांचे खांब हलविण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करावा, असे निर्देश राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या, "पीएमपीएमएलच्या ताफ्यात नव्याने समाविष्ट होणाऱ्या एक हजार बसेसचे देखभाल दुरुस्तीसह आर्थिक नियोजन करावे. पीएमपीएमएलला होणारा आर्थिक तोटा दोन्ही महापालिका भरून काढतात. आता त्यांनी आर्थिक सक्षम झाले पाहिजे. कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग, वेतनातील फरक, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याचे नियोजन करावे. तसेच महावितरणच्या विद्युततारा भूमिगत करणे आणि रस्त्यातील पथदिव्यांचे खांब हलविण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करावा,

# भूसंपादनाच्या मोबदल्यात टीडीआर देण्याची प्रक्रिया सुलभ ; 90 दिवसात देणार लाभ

## आराखडा रद्द झाल्यानंतर हद्दीचा स्ट्रक्चरल प्लॅन तयार करण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, असा प्रस्ताव प्राधिकरणाने राज्य शासनाकडे पाठविला.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेतील टीडीआर प्रक्रिया किचकट आणि वेळखाऊ असल्याचा आरोप केला जात होता. या प्रक्रियेत वेळ जात असल्याने जागा मालक त्रासून जातात. त्यांचा त्रास कमी सुलभ करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. आता भूसंपादनाच्या बदल्यात टीडीआर देण्याची कार्यवाही गतिमान करण्यात आली आहे. , टीडीआर निर्मितीच्या पहिल्या टप्प्यामध्ये प्रस्ताव दाखल झाल्यानंतरल ९० दिवसात मंजूर केला जावून प्रकरणाला मान्यता दिली जाणार आहे. अशी माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली.



महापालिकेत टीडीआर मिळण्यासाठी नागरिकांनी प्रस्ताव दाखल केल्यानंतर त्या प्रस्तावाला कधी मंजूरी मिळेल, याची श्वासवती नव्हती. तसेच फाईल विनाकारण अडवून ठेवण्याचे प्रकार देखील होत होते. काही अधिकाऱ्यांच्या खाबूगिरीमुळे संबंधित व्यक्तीला त्रास सहन करावा लागत होता. प्रस्ताव दाखल करताना अनेक किचकट प्रक्रियेचा सामना करावा लागत होता. तब्बल ४० प्रकारचे विविध कागदपत्रे जोडावी लागत होती. ती आता निम्म्यावर आणली जाणार आहेत. तर ९० दिवसात प्रकरण मार्गी लावले जाणार आहे. तसेच प्रस्ताव मंजूर केला अथला फेटाळा याचीही माहिती दिली जाणार असल्याचेही आयुक्त किशोर राम यांनी सांगितले.

प्रस्तावाच्या प्रक्रियेतील टप्पे कमी करणे आणि तांत्रिक अडचणी कमी करण्याबाबत उपाययोजना करणे आणि ही प्रक्रिया गतीमान करण्याचे आदेश महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले होते. भूसंपादन प्रक्रिया वेळेत झाल्यास महत्वाचे प्रकल्प मार्गी लागतील आणि नागरीकांना सुविधा उपलब्ध होतील, या दृष्टीने महापालिका प्रयत्नशील आहे.

> " टीडीआरचा प्रस्तावाची प्रक्रिया सुलभ करण्याचे प्रयत्न केले जात होते. त्यानुसार आता ही प्रक्रिया सुलभ करण्याचा निर्णय घेण्यात आला असून ९० दिवसात प्रस्तावाला मान्यता दिली जाईल. ही प्रक्रिया १ नोव्हेंबर पासून सुरु होईल. नवी प्रस्तावांना हा नियम लागू होईल. तर जून्या प्रस्तावांमधील तांत्रिक अडचणी दूर करुन त्यांना मान्यता दिली जाईल. वेळखाऊ आणि किचकट प्रक्रिया आता सुलभ झाल्याने नागरिकांचा त्रास वाचणार आहे."
>
> - नवल किशोर राम, आयुक्त, पुणे महापालिका.

# राजगडावर 'गड' कोण सर करणार? पक्षांकडून चाचपणी सुरु

## राजगड तालुक्यात आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी आतापासूनच सुरू झाली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राजगड तालुक्यात आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी आतापासूनच सुरू झाली आहे. तालुक्याच्या राजकारणाची दिशा ठरवणाऱ्या या दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कोणत्या गटावर कोणता पक्ष 'गड' सर करणार, याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. अनेक इच्छुक उमेदवारांनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली असून, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट),राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) , शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (ठाकरे गट) या प्रमुख राजकीय पक्षांनी देखील संभाव्य उमेदवारांची 'चाचपणी' सुरू केल्याची माहिती समोर येत आहे.

वेल्हे तालुक्यामध्ये जिल्हा परिषदेचे (गट) आणि पंचायत समितीचे (गण) मर्यादित असल्याने, प्रत्येक जागेसाठी तगडी स्पर्धा पाहायला मिळत आहे. या महत्त्वाच्या लढाईत राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, शिवसेना (शिंदे गट/ठाकरे गट) आणि काँग्रेस या प्रमुख पक्षांसह स्थानिक आघाड्यांमध्येही उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुकांमध्ये प्रचंड चुरस आहे. जिल्हा परिषदेसाठी दावेदार: माजी सदस्य, युवा नेते, तसेच अनेक नवीन चेहरे यांसारख्या इच्छुकांच्या नावांची चर्चा तालुक्याच्या राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

पंचायत समितीच्या गणांमध्येही गणातील प्रभावशाली व्यक्तीचे तसेच महिला कार्यकर्त्या, आणि त्या त्या गणातील इच्छुक यांसारखे अनेकजण शड्डू ठोकून उभे आहेत.

उमेदवाराची जनमानसात असलेली प्रतिमा, विजय होण्याची क्षमता, सामाजिक समीकरणे आणि मागील निवडणुकीतील कामगिरी या निकषांवर पक्षांकडून कठोर 'चाचपणी' केली जात आहे. प्रभावी व सर्वसमावेशक चेहरा देण्यासाठी पक्षांची रणनीती अंतिम टप्प्यात आहे. अनेक पक्ष युवा आणि नवीन चेहऱ्याला संधी देऊन निवडणुकीला एक वेगळे वळण देण्याचा विचार करत आहेत, जेणेकरून सत्ताधारी आणि विरोधक या दोघांनाही आव्हान देता येईल. आगामी काही दिवसांत उमेदवारी जाहीर झाल्यानंतर राजगड (वेल्हे) तालुक्याचे राजकीय चित्र अधिक स्पष्ट होईल.



### पक्षांकडून 'सर्वेक्षण' आणि 'चाचपणी'..

» सध्या राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते तालुक्यात गुप्तपणे सर्वेक्षण करत असल्याचे समजते. उमेदवाराची जनमानसात असलेली प्रतिमा, विजय होण्याची क्षमता, सामाजिक समीकरणे आणि मागील निवडणुकीतील कामगिरी या निकषांवर पक्षांकडून कठोर 'चाचपणी' केली जात आहे.

### कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता..

» पक्षांकडून अधिकृत घोषणा होण्यापूर्वीच, इच्छुकांनी त्यांच्या संपर्क क्षेत्रातील मतदारांच्या भेटीगाठी सुरू केल्या आहेत. कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक देखील आपल्या गटातून आणि गणातून कोणाची वर्णी लागणार याकडे लक्ष ठेवून आहेत. आगामी काही दिवसांत उमेदवारी जाहीर झाल्यानंतर राजगड (वेल्हे) तालुक्याचे राजकीय चित्र अधिक स्पष्ट होईल.

### रणनीतीवर भर..

» विशेषतः दोन्ही गटांसाठी (आरक्षण) लक्षात घेऊन, प्रभावी व सर्वसमावेशक चेहरा देण्यासाठी पक्षांची रणनीती अंतिम टप्प्यात आहे. अनेक पक्ष युवा आणि नवीन चेहऱ्याला संधी देऊन निवडणुकीला एक वेगळे वळण देण्याचा विचार करत आहेत, जेणेकरून सत्ताधारी आणि विरोधक या दोघांनाही आव्हान देता येईल.

# नकारात्मक बोलू नका, जनसेवक म्हणून काम करा ; दिलीप वळसे पाटलांचा कार्यकर्त्यांना कानमंत्र

## शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते

**पुणे | प्रतिनिधी**

"केंद्र आणि राज्य दोन्हीही सरकारे एकाच विचारधारेची असल्याने जिल्हा परिषद व पंचायत समिती पदाधिकारी निधी आणण्याचे काम अधिक प्रामाणिकपणे करतील. कार्यकर्त्यांनी नकारात्मक बोलणे बंद करून जनतेचे सेवक म्हणून काम करावे. असे प्रतिपादन माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले.स्वतःची उमेदवारी स्वतः जाहीर करू नका, सर्वांनी पक्षशक्ती वाढविण्यासाठी कामाला लागा. जिल्हा परिषदेत राष्ट्रवादीचा झेंडा फडकवायचा आहे." असा त्यांनी निर्धार करून पदाधिकारी, कार्यकर्त्यांना दिलीप वळसे पाटील यांनी भाषणातून कान टोचले आहे.

शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी म्हाडाचे अध्यक्ष, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, माजी आमदार पोपटराव गावडे आणि उपस्थित . या वेळी मंचावर प्रदीप वळसे पाटील, शिरूर-आंबेगाव विधानसभा अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर, राजेंद्र गावडे, प्रकाश पवार, सुभाष उमाप, सविता पऱ्हाड, बालाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सदाशिव पवार, कात्रज दूध संघाचे अध्यक्ष ॲड. स्वप्नील ढमढेरे, मनीषा गावडे, विश्वास कोहोकडे, सविता बगाटे, कात्रज दूध संघाच्या माजी अध्यक्षा केशरताई पवार, सुभाष उमाप,

आबासाहेब पाचुंदकर शिवाजीराव ढोबळे, सविता प्रमोद पऱ्हाड, शिवाजीराव ढोबळे, स्वप्नील ढमढेरे, मनीषा गावडे, राजेंद्र नरवडे, लहू थोरात, सुजाता नरवडे, निर्मला नवले, अजित कोहोकडे, विश्वास कोहोकडे, नंदकुमार पिंगळे, अमोल जगताप , माणिक खेडकर, सुदाम इचके, वासुदेव जोरी आदी मान्यवर उपस्थित होते.शिवाजीराव आढळराव पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, निष्ठावंत व प्रामाणिक कार्यकर्त्यांना उमेदवारी द्या. स्थानिक गाव पातळीवरील गट- तट पक्षाला हानी पोहोचवतात, त्यामुळे कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करावे.



### मानसिंग पाचुंदकर यांचे नेटके नियोजन..

» जिल्हा परिषद आणि पंचायत समिती गणांचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर प्रथमच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित गट) तर्फे कवठे येमाई येथे आयोजित भव्य मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. माहेश्वरी मंगल कार्यालयात झालेल्या मेळाव्यात पक्षाचे प्रमुख नेते, कार्यकर्ते, स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. मानसिंग पाचुंदकर यांचे नेटके नियोजन, पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. मेळाव्यामुळे आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट)ने आपले संघटन बळकट करण्याचा संदेश दिला असून, या मेळाव्यामुळे तालुक्यातील राजकीय समीकरणे चांगलीच ढवळून निघाल्याचे चित्र दिसून आले.